भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.४०९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०५/२०१७

**१) संगनमत करुन विवाहीतेचा हुंडयासाठी छळ करुन क्रुरतेची वागणुक देवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने गुन्हा नोंद . :—**

सन २०११ ते ०८/४/२०१७ पर्यत. यातील फिर्यादीची मुलगी वय २४ वर्ष, हिचे लग्न आरोपी क्रमांक १ सोबत सन २०११ ला झाले तेव्हा पासुन दिनांक ८/०४/२०१७ पर्यत तिचे पती, दिर व सासु यांनी तुला भात बनविता येत नाही तु भात कच्छा ठेवते तु भिकाऱ्याची पोरगी आहेस तु आपल्या आईकडुन पैसे आण तुझ्यावर बलत्कार झाला नाही. तु वेश्या आहेस तुच त्याला बोलावलीस असे म्हणुन आरोपीतांनी फिर्यादीच्या मुलीस क्रुरतेची वागणुक देवुन तिचे चारीत्र्यावर संशय घेवुन व मानसिक छळ करुन गाडी घेण्यासाठी आपले आईकडुन २०,०००/—रु. आण असे बोलुन त्रास देत होते. त्या त्रासाला कंटाळुन मुलीने आत्महत्या करुन मरण पावली असावी त्याचेवर कारवाई व्हावी अशी रिपोर्ट फिर्यादीने दिल्याने पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३०६,४९८(अ),३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी कांरडे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे ओव्हरटेक करुन मोटर सायकल चालकास धडक देवुन दोन महिलेस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २५/०५/२०१७ चे ०९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी माधव वासुदेव रेहपाडे वय २६ वर्ष, रा. माटोरा हा आपले मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ पी ९१३५ वर पत्नी सौ. निकीता वय २१ वर्ष, व बहीण सुषमा यांना गाडीवर बसवुन गर्भवती तपासणी करीता भंडारा येथे जात असतांना मागेहुन येणाऱ्या आरोपी मोटार सायकल चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन ओव्हरटेक करतांना कट मारुन पळुन गेला व फिर्यादीची पत्नी व बहीण हे खाली पडुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. कारधा येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) बुलोरो गाडी चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालाकस समोरुन धडक देवुन तिघांना गंभिर दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २५/०५/२०१७ चे ०८.१० वा. दरम्यान यातील फिर्यादी किशोर लक्ष्मण खोब्रागडे वय ३८ वर्ष, रा. पिंडकेपार याचा मित्र राजु दुधराम कराडे वय २५ वर्ष रा. पिंडकेपार हा आपले मोटा रसायकल क्रमांक एमएच ३५/एल ९२८१ वर तीन सिट बुसन एनएच ०६ रोडने कोहमारा कडे जात असता सोसायटी शाळेकफडन येणाऱ्या आरोपी बोलेरा गाडीच्या चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन रोड क्रास करुन मोटार सायकला समोरुन धडक देवुन मोटार सायकल चालकास व गाडीवर बसणाऱ्या सौ. मेहुणी सुप्रीया लाडे वय २२ वर्ष, व मुलगी कु. प्रिती लाडे वय ३ वर्ष, यांना गंभिर दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम २७९,३३८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन लाचरक्कम स्विकारल्याने गुन्हा नोदं . :–**

दिनांक २५/०५/२०१७ चे १३.३८ वा. दरम्यान यातील दोन्ही आरोपीतांनी तक्रारदार मोहम्मद शेख यांना त्याचे मुलाचे नावे परीपुर्ण केलेल्या कामाचे प्रलंबित बिल काढुन देण्यासाठली तसेच यापुर्वी काढुन दिलेल्या बिलाचे असे दोन्ही कामाचे दोन्ही आरोपीतांनी पोटासाठी एकत्रीतरित्या २२,०००/–रु. लाचेची मागणी करुन तडजोडी नंतर २०,०००/–रु. लाचेची रक्कम दोन दिवसांनी स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने प्रत्यक्ष सापळा कारवाई वेळी आरोपी लोकसेवक क्रमांक १ ने आपले लोकसेवक पदाचा दुरउपयोग करुन २०,०००/–रु.ची लाच रक्कम स्विकारल्याने पोस्टे. साकोली येथे कलम ७,१७(१) (ड) सहकलम १३(२) ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. पारधी पो. स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) संगनमत करुन जुन्या भांडणावरुन रस्त्यात अडवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०५/२०१७ चे १०.३० वा. दरम्यान यातील दोन्ही आरोपीतांनी जुन्या भांडणावरुन संगनमत करुन फिर्यादीचा मुलगा मयुर पारडीकर हे घरा कडुन मोटार सायकलने ग्रामपंचायत कडे जात असता त्यास रस्त्यात आडवे होवुन थांबवुन तुला मारतो असे म्हणुन फिर्यादीच्या साळयाची पत्नी सौ. देवयानी दिगांबर पटले तिला तुझी साळी सोडतो व अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तुला पाहुण अशी धमकी दिल्याने फिर्यादी रामनाथ कुंजीलाल पारडीकर वय ४३ वर्ष, रा. मासलमेटा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. लाखनी येथे कलम ३४१,५०९,५०६,३४ भांदवि गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**६) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक २५/०५/२०१७ चे १८.०० ते १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी मधुकर करुलु लोळे वय ५१ वर्ष, रा. पाचगाव यांनी आपली हिरो होंडा स्प्लेंन्डर मोटार साकयल क्रमांक एमएच बी २०६६ किंमती २२,०००/–रु. ची डॉक्टर अवघाते यांचे दवाखाण्या समोर उभी वरठी आठवडी बाजार करण्या करीता गेले असतांना कोणीतरी अज्ञात चोराने कुणी नसल्याची संधी साधुन मोटार सायकल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कुंभलकर पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**७) घराचे समोरील दाराचा लॉक तोडुन कपाटामधील सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०५/२०१७ ते २४/०५/२०१७ चे ०३.०० ते १७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ईकबाल आरिफ सैय्यद वय ४१ वर्ष, रा. अंबिका नगर भंडारा (भोजापुर) हा दिनांक १८/०५/२०१७ ला कुंटुबासह घराला ताला लावुन सासऱ्यांच्या गावी गेला असता कोणीतरी अज्ञात आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन समोरील दाराचा लॉक तोडुन आत प्रवेश करुन कपाटाचे लॉकरमधुन १ ग्रॅम सोन्याचे रिंग, १० तोडे चांदीचे पायल व नगदी ७००/–रु. असा एकुण ७,७००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

८) सार्वजनीक ठिकाणी लोखंडी चाकु घेवुन अवैद्यरित्या मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २५/०५/२०१७ चे २०.३० वा. दरम्यान यातील आरोपी हा हातात एक लोखंडी चाकु १२.२ इंच लांबीचा सार्वजनीक ठिकाणी अवैद्यरित्या घेवुन मिळुन आल्याने मा. जिल्हाधिकारी सा. भंडारा यांचे कलम ३७(१)(३) मपोका आदेशाचे उल्लघंन केल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. जाधव यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १३५ मपोका . अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाधव पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

26.5

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ९९८७३८५४०५

PSL

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.